आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१२ ऑक्टोबर २०२६, सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रात प्रारूप मतदार याद्यांसंदर्भात दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी २६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

- मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला राहुल गांधी यांचं सर्वोच्च न्यायालयात आव्हान/ जनतेनं नाकारल्यामुळे काँग्रेस देशात अराजक माजवण्याचा प्रयत्न करत असल्याची देवेंद्र फडनवीस यांची टीका

- पाणबुडीरोधक नौका आयएनएस मंग्रोल नौदलात दाखल

- अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार यंदा रॉबर्ट हॉल आणि मायकल वुडफोर्ड यांना जाहीर

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांचं निधन

**<><><><><>**

राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेच्या वेळापत्रकात पुन्हा बदल करण्यात आला आहे. नव्या वेळापत्रकानुसार, प्रारूप मतदार याद्यांसंदर्भात दावे आणि हरकती दाखल करण्याची मुदत येत्या २६ ऑक्टोबरपर्यंत असेल. दावे आणि हरकतींचा निपटारा १० नोव्हेंबरपर्यंत चालू राहील, तर अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

**<><><><><>**

मतदार याद्यांचं विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआरला आव्हान देणारी याचिका, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाचा भाग म्हणून, काँग्रेससह विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आज सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढला आणि ही याचिका दाखल केली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांना भेटून एसआयआरची प्रक्रिया आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीचं निवेदन देण्याचं काँग्रेसचं नियोजन होतं, पण यासंदर्भातल्या याचिकांवर न्यायालयात

सुनावणी सुरू असल्याचं सांगून सरन्यायाधीशांनी ही भेट नाकारली. सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार सर्वांना आहे, असं ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- न्यायमूर्ती सूर्यकांत***

विरोधकांनी दाखल केलेली याचिका, संबंधित याचिकांबरोबरच विचारात घेऊ, असंही त्यांनी सांगितलं होतं.

**<><><><><>**

एसआयआर प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत काँग्रेसनं आज नवी दिल्लीत आंदोलन केलं. दिल्लीतल्या लोकशाही बचाव आंदोलनात महाराष्ट्राचे काँग्रेसचे प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्यासह इतर नेते सहभागी झाले होते. ज्ञानेश कुमार यांना अटक करण्याची मागणी करत मुंबईतही टिळक भवनासमोर काँग्रेस नेत्यांनी आंदोलन केलं.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आपण सरन्यायाधीशांना पत्र लिहून निवडणुकांच्या निःपक्षतेबाबत चिंता व्यक्त केल्याचं राहुल गांधी यांनी आज वार्ताहर परिषदेत सांगितलं. मतांच्या कथित चोरीविरोधात दिल्लीत अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू असून लोकांना दिल्लीत पोहोचण्यापासून रोखलं जात असल्याचं गांधी म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेस पक्षाला विविध राज्यांनी वर्षानुवर्षं नाकारलं आहे, त्यामुळे पुनरागमन करण्यासाठी देशात अराजक माजवण्याचा प्रयत्न काँग्रेस करत आहे, असी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केला आहे. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते. सर्वोच्च न्यायालयावर विरोधी पक्षांनी काढलेल्या मोर्चावरही त्यांनी टीकास्त्र सोडलं.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडनवीस***

सर्वोच्च न्यायालयाला कमकुवत करायचा काँग्रेसचा डाव आहे, मात्र तो यशस्वी होणार नाही, असंही फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

आयएनएस मंग्रोल ही उथळ पाण्यात काम करणारी पाणबुडीरोधक नौका आज भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. मुंबईच्या नौदल गोदीमध्ये आज हा कार्यक्रम

झाला. पश्चिम नौदल कमांडचे ध्वजाधिकारी व्हाईस ॲडमिरल संजय वात्स्यायन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या नौकेमध्ये ८० टक्के स्वदेशी भाग वापरल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. अशा १० नौका यावर्षी नौदलात सामील झाल्या असून आणखी ८ नौका लवकरच सामील होतील असं ते म्हणाले..

कोची इथल्या कोचीन शिपयार्डनं या नौकांची निर्मिती केली आहे. या नौकेवर अभय सोनार उपकरणं, हलके टॉर्पेडो, स्वदेशी रॉकेट लॉन्चर तसंच मारीच आधुनिक टॉर्पेडो रोधक यंत्रणा बसवली आहे. देशातल्या बंदरांच्या संरक्षणासाठी या नौका उपयोगी ठरणार आहेत.

<><><><><>

अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार यंदा रॉबर्ट हॉल आणि मायकल वुडफोर्ड यांना जाहीर झाला आहे. व्यापक अर्थव्यवस्थेतलं स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी सूक्ष्म अर्थव्यवस्थेचा पाया या विषयावर त्यांनी विकसित केलेल्या मॉडेलसाठी त्यांना हा पुरस्कार दिल्याची घोषणा रॉयल स्विडिश अकादमी ऑफ सायन्सेसनं आज केली. महागाई, उपभोग आणि उत्पादन यासारख्या घटकांमधल्या सांख्यिकीय संबंधांच्या आधारे मॉडेल्स तयार करण्याऐवजी त्यांनी सूक्ष्म आर्थिक पायावर आधारित मॉडेलवर लक्ष केंद्रित केलं. एक-एक कुटुंब आणि व्यवसायांच्या एकत्रित कृतींचा अर्थव्यवस्थेवर कसा परिणाम होतो, यावर या मॉडेलमध्ये भर दिला आहे.

<><><><><>

ज्येष्ठ मराठी अभिनेत्री मधु कांबीकर यांचं आज पुण्यात प्रदीर्घ आजारानं निधन झालं. त्या ७३ वर्षांच्या होत्या. गेल्या अनेक वर्षांपासून त्या पक्षाघाताच्या आजाराशी झुंज देत होत्या. अखेर आज त्यांची प्राणज्योत मालवली.

मधु कांबीकर यांनी तमाशाच्या फडातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. व्यावसायिक रंगभूमीवर महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमात त्या लावणी सादर करत. राजदत्त यांच्या शापित या चित्रपटातून त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. 'हेच माझं माहेर', 'राघू मैना', 'एक होता विदूषक', 'झपाटलेला', 'डेबू' आणि 'येऊ का घरात' हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट. 'सखी माझी लावणी' या कार्यक्रमातून मधु कांबीकर यांनी लावणीला जागतिक ओळख मिळवून दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी मधु कांबीकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

केंद्र सरकारनं २०४७ पर्यंतच्या राष्ट्रीय पोलाद धोरणाचा मसुदा तयार केला आहे. पोलादाची देशांतर्गत मागणी पूर्ण करणं आणि जागतिक बाजारपेठेत पोलादाचा पुरवठादार म्हणून भारताचं स्थान मजबूत करणं ही या धोरणाची उद्दिष्टं आहेत. देशातली पोलादाची दरडोई मागणी ११६ किलोग्रॅमवरुन वाढून ३०२ किलोग्रॅमपर्यंत जाईल असा अंदाज या धोरणात व्यक्त केला आहे. कच्च्या पोलादाचं उत्पादन २०१४-१५ या वर्षात ८ कोटी ९० लाख टन होतं, ते गेल्या वर्षात १७० लाख टनांपर्यंत पोहोचलं आहे. २०४७पर्यंत पोलाद निर्यातीत साडेचार कोटी टनांची वाढ, कार्बन उत्सर्जनाचं प्रमाण कमी करुन पर्यावरणस्नेही उत्पादन, लोखंडाचा पुनर्वापर, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित यंत्रांचा वापर अशा विविध मुद्द्यांचा उल्लेख या धोरणात आहे.

<><><><>

जपानमध्ये नुकत्याच झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये २७ पदकं जिंकणाऱ्या तिन्ही सशस्त्र दलांमधल्या खेळाडूंचा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी गौरव केला. या खेळाडूंनी सहा सुवर्ण, अकरा रौप्य आणि दहा कांस्य पदकं जिंकली आहेत. या खेळाडूंनी त्यांच्या शिस्तीचं, कठोर परिश्रमांचं आणि सांघिक भावनेनं केलेल्या प्रयत्नांचं राजनाथ सिंग यांनी कौतुक केलं.

<><><><>

सप्टेंबर महिन्यात देशात किरकोळ चलनफुगवट्याचा दर वाढून ५ पूर्णांक ५४ शतांश टक्के झाला. ऑगस्टमधे हा दर ४ पूर्णांक ८३ शतांश टक्के होता. ग्रामीण भागात चलनफुगवट्याचा दर ६ पूर्णांक ८ शतांश टक्के पर्यंत पोहचला तर शहरी भागात हा दर ४ पूर्णांक ८८ शतांश टक्के राहिला. अन्नधान्यांच्या ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईचा दर ऑगस्टमधे ५ पूर्णांक ९७ शतांश टक्के होता, तो सप्टेंबरमधे ७ पूर्णांक ७४ शतांश टक्क्यांवर पोहोचला. या महिन्यात कांदा, लसूण, आलं, लिंबू, खाद्य आणि पेयं यांची भाववाढ झाल्यामुळे हा दर वाढल्याचं सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><>

सेनादलांमधे आधुनिकीकरण आणि आत्मनिर्भरता साध्य करण्यासाठी केंद्रसरकार सातत्यानं पावलं उचलत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. भारतीय लष्कर आणि भारतीय अन्न महामंडळादरम्यान आज नवी दिल्लीत भारत राईस उपक्रमाच्या समझोता करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यावेळी उपस्थित होते.

<><><><>

भारत आणि यूकेमधील द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत दुप्पट व्हावा, अशी अपेक्षा केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केली आहे. भारत - यूके संयुक्त आर्थिक आणि व्यापार समिती अर्थात जेटकोच्या परिषदेत ते बोलत होते. भारत - यूके द्विपक्षीय आर्थिक संबंध अधिक दृढ व्हावेत अशी भारताची इच्छा आहे, असं ते म्हणाले. यामुळे दोन्ही देशांमध्ये व्यापाराच्या नवनवीन संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><>

केंद्रीय क्रीडा आणि युवा व्यवहार मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी आज गुजरातच्या अहमदाबाद इथं ब्रिक्स पारंपरिक आणि देशी खेळ प्रदर्शन स्पर्धांचं उद्घाटन केलं. सांस्कृतिक ओळख जपणं आणि जागतिक सहकार्याच्या नव्या संधी निर्माण करण्यात हे खेळ सेतू म्हणून काम करतात, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी बोलताना केलं.

<><><><>

वैद्यकीय आस्थापनांच्या सेवा आणि सुविधांचे दर ठळक पद्धतीनं दर्शवले जावेत, असं केंद्र सरकारनं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. रुग्णांना योग्य निर्णय घेता यावेत, शुल्कासंबंधीचे वाद टळावेत आणि आरोग्य सेवा क्षेत्रात विश्वास वाढावा, यासाठी हे पाऊल सरकारनं उचललं आहे. केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलील श्रीवास्तव यांनी यासंदर्भात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहिलं आहे.

<><><><>

टपाल विभागाच्या मुंबई इथल्या मुख्यालयानं आज फिलाटली डे अर्थात टपाल तिकीट संग्रह दिन साजरा केला. देशभरात साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय टपाल सप्ताहचा हा एक भाग आहे. त्यात तिकीट संग्रह प्रेमींसाठी विविध उपक्रम आयोजित केले होते.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१२ ऑक्टोबर २०२६, सोमवार

**//<><><><><>//**